SELF-NURTURING "YOUTH LEADERSHIP NETWORK"

An Initiative of

# University of Mumbai

## Annual Youth Conclave - 2013




# 12 JANUARY 2013

Students of
100 colleges of University of Mumbai
from Six Districts
Mumbai, Mumbai Suburban, Thane, Raigad, Ratnagiri, Sindhudurg

**EMPOWERMENT : CREATION OF YOUTH LEADERSHIP**

Venue- Sports complex, University of Mumbai, Vidyanagari, Kalina campus, Santacruz (E), Mumbai- 400 098.

# “साठ वर्षानंतरही आपण एकरूप समाज

# झालो आहोत का?” – सुरेश शेट्टी

मुंबई – ‘स्वामी विवेकानंदांनी आपल्या ३९ वर्षांच्या आयुष्यात केवळ भारताचेच नव्हे तर जगाचे अध्यात्मिक आणि बौद्धिक नेतृत्व केले’ असे उद् गार आरोग्यमंत्री श्री. डॉ. सुरेश शेट्टी यांनी आज काढले.

मुंबई विद्यापीठाने स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या ‘युवा दिना’च्या उद् घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या युवा परिषदेला मुंबई विद्यापीठाच्या १०० महाविद्यालयातून जवळपास ४००० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ राजन वेळूकर होते.स्वातंत्र्य ६० वर्षे उपभोगल्यावरही एक समाज म्हणून आपण ख-या अर्थाने एकजीव झालो आहोत का? असा प्रश्न विचारून डॉ.शेट्टी म्हणाले,“जरी आपल्याला इंग्रजांच्या जोखडापासून स्वातंत्र्य मिळाले असले तरीही आपण आपल्याच काही चुकीच्या धारणांचे गुलाम आहोत. आज आपल्यापैकी किती लोक स्वत: प्रथम भारतीय आणि नंतर गुजराथी,मराठी, कानडी असे समजतात?” जोपर्यंत लोकशाही सुरक्षित आहे तोपर्यंतच परिवर्तनाची शक्यता असल्याचे मांडून श्री. शेट्टी म्हणाले, जर आपण युवकांना सबल केले तरच आपण समाजाचे सबलीकरण करू शकू".

उद्घाटनप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. वेळूकर म्हणाले, ‘ माझ्या ३० वर्षाच्या शैक्षिणक कारकिर्दीत परिस्थितीत बदल कोण घडवू शकेल याचा मी जेव्हाजेंव्हा विचार केला तेव्हा मला प्रत्येकवेळी एकच उत्तर सापडते,ते म्हणजे देशाचा युवा वर्ग !’ स्वा.विवेकानंदाचे उद् गार उद्धृत करताना कुलगुरू म्हणाले, ‘परिस्थिती सुधारत नसते ती बदलण्याच्या प्रयत्नात आपण सुधारत

असतो". "आपल्या दुखा:चे खरे कारण आपली दुर्बलता हेच असते.’असे विवेकानंदांचे मत होते.

**“नैतिकता आणि प्रामाणीकपणाच्या क्षेत्रात आज स्पर्धा नाही” –डॉ. वेद प्रकाश, अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग.**

‘सबलीकरणासाठी शिक्षण आणि नैतिक मूल्ये’ या विषयावर पहिल्या चर्चासत्रात बोलताना विद्यापीठ आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेद प्रकाश म्हणाले, ‘जगात इतके धर्म असलेला आणि तरीही परस्परांचा आदर करीत शांततेने जगणारा भारताशिवाय दुसरा समाज अस्तित्वात नाही. भारताची अनेक शक्तीस्थळे आहेत असे मांडताना ते म्हणाले, ‘जगातील शास्त्रज्ञांचा सर्वात मोठा दुसरा समुदाय भारतात राहतो, भारत ही जगातली दहावी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. या देशात सर्वात जास्त म्हणजे ९०० दशलक्ष भ्रमणध्वनी आहेत मात्र याच्याशी विरोधाभास करणारी काही सत्ये पण आपण स्वीकारली पाहिजेत’ असे सांगून डॉ. वेद प्रकाश यांनी देशातील साक्षरतेच्या शिक्षणाच्या,आरोग्याच्या व पायाभूत सुविधांच्या भीषण परिस्थितीचा आढावा घेतला.या सर्वांवर खरा उपाय म्हणजे समावेशक शिक्षणपद्धती (Inclusive Education) असल्याचे सांगून ते म्हणाले, ‘गुणवत्तापूर्ण शिक्षण हा सुद्धा आपल्या येणा-या काळात प्राधान्यक्रम असला पाहिजे. येणा-या काळात नाविन्य, संशोधन, नैतिक मूल्यसंवर्धन याही गोष्टी निर्णायक ठरणार आहेत. येणारा भारत हा चतुर (Smart) भारत असला पाहिजे,असेही ते म्हणाले.

जीवनातील आव्हानांना सकारात्मक दृष्टीकोनातून दिलेला प्रतिसाद, भारावून टाकणारी स्वप्ने आणि आयुष्यभर शिकत राहण्याची तयारी या तीन गोष्टी यशाची खरी गुरुकिल्ली आहे. असे सांगून डॉ.वेद प्रकाश म्हणाले,‘तरुण मित्रांनो

आपली नैतिकता आणि प्रामाणिकपणा सोडू नका आज प्रामाणिकपणाच्या क्षेत्रात तुम्हाला काहीही स्पर्धा नाही.’

दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिनेश सिंग यांनी आपल्या भाषणाची सुरवात मराठीत केली नंतर राष्ट्रभाषेकडे वळत ते म्हणाले, ‘आजच्या जगात नावीन्यपूर्ण निर्मितीला अनन्य साधारण महत्व आहे. आज विवेकानंदांचा १५० वा जन्मदिन साजरा करीत असताना आपल्याला हे विसरून चालणार नाही की, आपल्यावर अनेक स्वातंत्र्यसेनानींचे ऋण आहे. महाराष्ट्राला अशा अनेक स्वातंत्र्य सेनानींची परंपरा असल्याचे सांगून त्यांनी आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

**“सास बहु मालिका म्हणजे केवळ कचरा! आता समाजाने, पोलीस,न्यायपालिका, सरकार याप्रमाणेच प्रसार मध्यामांवरही वचक ठेवण्यासाठी दबाव गट स्थापन केले पाहिजेत. –निखिल वागळे**

‘समाजाच्या सबलीकरणासाठी प्रसारमाध्यमे’ या दुस-या चर्चासत्रात बोलताना श्री. निखिल वागळे म्हणाले, ‘विवेकानंदांचे अध्यात्म हे ग्रामीण व शहरी भागातील वंचित तरुणांना नवी आशा देणारे तत्वज्ञान होते. अनेकदा मला तुमचा पत्रकारितेतील धर्म कोणता? असे विचारले जाते त्यावेळी मी शेवटच्या माणसाचा आवाज बुलंद करणे हाच माझा धर्म असल्याचे सांगतो. देशात जे पहिले देशीवृत्तपत्र सुरु झाले त्या “बेंगॉल गॅझेट”ने सुरवातीपासून सतीच्या चालिला विरोध केला. त्यामुळे या देशात पत्रकारितेचा आणि सामाजिक बांधीलकेचा इतिहास एकत्रच गुंफला आहे. पत्रकारांना सामाजिक बांधिलकी असावी का? हा प्रश्नच त्यामुळे निरर्थक आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेबांनी देशाला दिलेली घटना हीच मुळात सामाजिक बांधिलकीची असल्यामुळे सामाजिक बांधिलकी नसलेला माणूस हा पत्रकारच काय तो खरा भारतीय नागरिकही नाही असे माझे मत आहे.’ भारतीय

पत्रकारितेचा आढावा घेताना श्री. वागळे यांनी लोकमान्य टिळक, आगरकर, महात्मा गांधी, डॉ.आंबेडकर यांच्याबरोबरच नारायण मेघाची लोखंडे यांचेही नाव विशेष गौरवाने घेतले. निरपेक्षपणे केलेले सत्यशोधन हेच पत्रकारितेचे काम आहे' असे त्यांनी आवर्जून सांगितले. आपल्या परखड शैलीत बोलताना श्री. वागळे यांनी सास-बहु सारख्या मालिका हा केवळ कचरा आहे आणि तो आवडीने पाहणारे, पर्यायाने त्याचा टी.आर.पी. वाढवून त्याचे समर्थन करणारे प्रेक्षकही प्रसारमाध्यमांतील वाईट गोष्टींना जबाबदार असल्याचे म्हटले, आज समाजहितासाठी विविध गटांचा दबाव राज्यकर्ते, पोलीस, न्यायव्यवस्था यांच्यावर निर्माण करावा लागतो. तसाच तो प्रसार माध्यमांवरही निर्माण करा असे कळकळीचे आवाहनही त्यांनी केले.

या विषयावर आपले विचार मांडतांना श्रीमती बरखा दत्त म्हणाल्या, 'काय करणे म्हणजे चांगली पत्रकारिता नाही याबाबतीत मी वागळे यांच्याशी सहमत आहे. माझ्या मते ज्यांना आवाज नाही अशा दुर्लक्षित घटकाचा आवाज होणे हेच प्रसारमाध्यमांचे खरे ध्येय असले पाहिजे आणि असे करताना पत्रकारांनी प्रसंगी समाजाचा रोष ओढवून घेऊन अलोकप्रिय होण्याची तयारी ठेवली पाहिजे मात्र, सत्य हे काळे आणि पांढरे अशा स्पष्ट रंगात उपलब्ध होत नसून त्याच्या संमिश्र छटा असतात ते गुंतागुंतीचे व विविध छटांचे असते त्याचा शोध घेत असताना सत्याच्या सर्व बाजू प्रकाशात आणणे हे ख-या पत्रकाराचे काम आहे. आज वृत्तवाहिन्यांची पत्रकारिता ही एखाद्या रीॲलिटी-शोच्या थेटरसारखी झाली आहे. काही वृत्तवाहिन्या तर बातम्यांतून मनोरंजन करू लागल्या आहेत.' असे सांगून श्रीमती दत्त म्हणाल्या, आपल्याला अशा वाईट गोष्टींना उत्तेजन द्यायचे नसेल तर अशा वाहिन्या न बघणे त्यांचा टी.आर.पी. कमी करुन त्यांना चांगल्या बदलास भाग पाडणे हे प्रेक्षकांचे कर्तव्य आहे. आम्हाला आमच्या ख-या ध्येयाबद्दल जागृत करणे हे तुमचेच काम आहे ते निर्भयपणे करा, असे आवाहन श्रीमती दत्त यांनी युवा वर्गाला केले.

## मुन्नाभाईने जबाबदारीची जाणीव करून दिली –राजू हिरानी.

‘लगे रहो मुन्नाभाई’, ‘थ्री इडियट’आणि ‘पिके’सारख्या अत्यंत लोकप्रिय चित्रपटांचे दिग्दर्शक श्री.राजकुमार हिराणी यांनी चित्रपट सृष्टीचे प्रतिनिधित्व करताना सांगितले की, सिनेमा सामाजिक परिवर्तन करू शकतो काय? हा वाद जुनाच आहे. आधी मीही इतरांप्रमाणेच चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन आहे या भावनेतून काम करत होतो मात्र, एक दिवशी जेव्हा मुंबईतील वरळीच्या एका चौकात माझे एक मित्र श्री.शांतनु मोहित्रा यांच्या हातून एक ट्राफिक सिग्नल तुटला. लगेच ते पोलिसाला शोधू लागले. जवळपास पोलीस न सापडल्यामुळे पुढच्या चौकात जाऊन पोलिसाला त्यांनी स्वत:विरुद्ध पावती फाडायला लावली तेव्हा मला माझ्याच मुन्नाभाई चित्रपटाचा समाजमनावर काय परिणाम झाला ते कळले आणि मी हबकलो. त्यानंतर मला माझी जबाबदारी वाढल्याचे तीव्रपणे जाणवले.चित्रपट व्यावसायिकांनी जरी समाजाचे रंजन करायचे असले तरी त्यांनी कधीही आपला आत्मा विकू नये असे आवाहन करुन श्री. हिराणी म्हणाले, प्रत्येक कलाकृती ही आपली शेवटची आहे असे समजून ती सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करावा.

दूरदर्शनवरील ‘उडान’ या मालिकेमुळे माझी अत्यंत सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेली पत्नी प्रभावित झाली आणि पैशाचे पाठबळ नसताना तिने आपले एअर होस्टेस बनण्याचे स्वप्न पूर्ण केले. असे हिराणी यांनी तरुण वर्गावर असलेल्या टी.व्ही.चा प्रभाव मान्य केला.

शासकीय प्रसार माध्यमांची बाजू मांडतांना श्री. मुकेश शर्मा म्हणाले. ‘ दूरदर्शनने आपला आशय सकारात्मक व सघन ठेवण्याचा नेहमी प्रयत्न केला आहे. सर्वसामान्य नागरिकापर्यंत विकासाचा संदेश पोहोचवणे हे आमचे काम आहे.’

**तिस-या सत्रात**शिवसेनेचे खासदार श्री. संजय राउत, भाजपचे आमदार श्री.देवेंद्र फडनवीस, राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड,मनसेचे आमदार श्री. नितीन सरदेसाई यांनी "सेवेसाठी राजकारण"या विषयावर आपले विचार मांडले.


विनोदकुमार माळाळे,

जनसंपर्क अधिकारी.

मुंबई विद्यापीठ.

9869790066